ePaper
हीभूक कधीही न संपणारी असते... तिकीटासाठी इच्छुकांच्या गर्दीवर गडकरी यांची टोलेबाजी

| वर्ष - 9 I अंक -122 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com I शुक्रवार, दि. 26 डिसेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



**आतील पानांत**

- कोहलीने 'विराट' रेकॉर्ड मोडला
- गीत ऐकत असताना रोहितचे डोळे पाणावले
- भारताचे अंतराळवीर चंद्रावर जाणार
- इंडिगोच्या दोन नव्या कंपन्यांना मान्यता

**निवडणुकीची रणधुमाळी** दोन्ही राष्ट्रवादींच्या संभाव्य आघाडीची मुरलीधर मोहोळांनी उडवली खिल्ली

# 'दादा विरुद्ध अण्णा' संघर्ष पेटणार ?

## छोटे पैलवान एकत्र येतायत' अशी मोहोळांची शेलकी टीका

I पुणे I प्रतिनिधी I
महाईन्यूज

**पुणे महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू होत असतानाच शहरातील राजकारण चांगलेच तापू लागले आहे. भाजप-शिवसेना युती एका बाजूला आकार घेत असताना, दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमधील जवळीक आणि संभाव्य आघाडीच्या चर्चांनी राजकीय वातावरणात खळबळ उडवली आहे. मात्र या चर्चांवर पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केलेल्या शेलक्या टीकेनंतर आता पुण्यात 'दादा विरुद्ध अण्णा' असा नवा राजकीय संघर्ष उफाळून येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**



## भाजपच्या ताकदीपुढे विरोधक एकत्र पुणे महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत राजकीय वाकयुद्ध तीव्र

### महापालिका निवडणूक आणि आघाड्यांचे राजकारण

पुणे महापालिका निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक न राहता, राज्याच्या राजकारणाची मिनी विधानसभा निवडणूक म्हणून पाहिली जाते. त्यामुळे सर्वच पक्षांनी या निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. भाजपने शहरात आधीपासूनच मजबूत संघटनात्मक बांधणी केली असून, मागील तीन महापालिका निवडणुकांमध्ये पुणेकरांनी भाजपला स्पष्ट कौल दिला आहे. याच पार्श्वभूमीवर भाजप-शिवसेना युती एकीकडे मजबूत होत असताना, भाजपला रोखण्यासाठी विरोधकांकडून वेगवेगळ्या आघाड्यांचे पर्याय तपासले जात आहेत.

### दोन्ही राष्ट्रवादींच्या युतीच्या चर्चांना वेग

अजित पवार गट आणि शरद पवार गट पुन्हा एकत्र येणार का, किंवा किमान पुणे महापालिका निवडणुकीपुरती तरी आघाडी करणार का, याबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहेत. पिंपरी-पुण्यातील काही गुप्त बैठका, नेत्यांच्या भेटी आणि सूचक विधाने यामुळे या चर्चांना अधिकच बळ मिळालं आहे. भाजपविरोधात ताकद एकवटण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊ शकतात, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

### भाजपची बैठक आणि पहिल्या यादीवर चर्चा

दरम्यान, भाजपची काल रात्री उशिरापर्यंत एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत पुणे महापालिकेच्या पहिल्या उमेदवार यादीवर अंतिम चर्चा झाल्याची माहिती आहे. भाजपने यावेळी निवडणूक व्यवस्थापन, वॉर्डनिहाय रणनीती आणि संभाव्य उमेदवारांवर सविस्तर विचारमंथन केल्याचं सांगितलं जात आहे. या बैठकीनंतर मुरलीधर मोहोळ यांनी माध्यमांशी संवाद साधला आणि याच वेळी त्यांनी दोन्ही राष्ट्रवादींच्या संभाव्य युतीवर खोचक प्रतिक्रिया दिली.

### मोहोळांचा 'पैलवान' टोला

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चांवर प्रश्न विचारला असता मुरलीधर मोहोळ म्हणाले, "भाजपच्या विरोधात सगळे एकत्र येत आहेत. दोन राष्ट्रवादी एकत्र येत असतील तर त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. पण पुणेकरांनी भाजपला भक्कम साथ दिली आहे. गेल्या तीन निवडणुकांमध्ये पुणेकरांनी आम्हाला साथ दिली आणि यावेळेसही तसंच वातावरण दिसत आहे. त्यामुळे काय करायचं तर सगळे एकत्र लढायचं, असं समोरच्यांचं ठरलेलं दिसतंय. याचा अर्थ असा की पैलवान मजबूत आणि ताकदवान आहे, म्हणून सगळे छोटे छोटे पैलवान एकत्र येत आहेत."

मोहोळ यांच्या या वक्तव्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. अजित पवार आणि इतर विरोधी नेत्यांना 'छोटे पैलवान' अशी अप्रत्यक्ष उपमा दिल्यामुळे हा वाद केवळ शब्दांपुरता न राहता, थेट राजकीय संघर्षात रूपांतरित होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

### 'दादा विरुद्ध अण्णा' संघर्षाचीनांदी?

मुरलीधर मोहोळ यांना पुण्यात 'अण्णा' म्हणून ओळखले जाते, तर अजित पवार हे 'दादा' म्हणून राज्यभर प्रसिद्ध आहेत. मोहोळांच्या वक्तव्यानंतर आता पुण्यात 'दादा विरुद्ध अण्णा' असा नवा राजकीय वाद रंगण्याची शक्यता वर्तवली जात आहे. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांकडून या वक्तव्यावर प्रतिक्रिया येण्याची शक्यता असून, अजित पवार गट मोहोळांच्या टीकेला कशा पद्धतीने उत्तर देतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मोहोळांचे वाढते वजन

खासदार म्हणून निवडून आल्यानंतर मुरलीधर मोहोळ यांच्या खांद्यावर केंद्रीय राज्यमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या खात्यात राज्यमंत्री म्हणून काम करत असताना, मोहोळ यांनी दिल्लीतील वजनदार संपर्क वाढवले आहेत. त्याचवेळी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू सहकारी म्हणूनही ओळखले जातात. या पार्श्वभूमीवर पुण्याच्या राजकारणात मोहोळांचे पारडे अधिकच जड होत असल्याची चर्चा भाजपच्या अंतर्गत वर्तुळात आहे.

### राष्ट्रवादीला तडे देण्याचा प्रयत्न?

भाजपकडून पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसला तडे देण्याचे प्रयत्न सुरू असल्याचीही चर्चा आहे. काही नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधला जात असल्याचे संकेत मिळत आहेत. याच पार्श्वभूमीवर मोहोळांच्या वक्तव्याकडे केवळ भाष्य म्हणून नव्हे, तर राजकीय रणनीतीचा भाग म्हणून पाहिले जात आहे. 'दादा विरुद्ध अण्णा' हा संघर्ष आगामी निवडणुकीत भाजपला कितपत फायदा करून देतो, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### पुण्याच्या राजकारणात पुढे काय?

एकीकडे भाजप आत्मविश्वासाने निवडणुकीला सामोरे जात असल्याचं चित्र आहे, तर दुसरीकडे विरोधक एकत्र येण्याच्या प्रयत्नात आहेत. मात्र मोहोळांच्या वक्तव्यानंतर राजकीय ध्रुवीकरण अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. पुणेकरांच्या मनात कोण बाजी मारणार, हे येत्या काही आठवड्यांत स्पष्ट होईल. मात्र सध्या तरी पुण्याच्या राजकारणात 'दादा विरुद्ध अण्णा' हा संघर्ष केंद्रस्थानी येताना दिसत आहे.

## दोन दिवसांत ठरणार आघाडी

## भेटीचा संबंध राजकारणाशी जोडू नये: सुप्रिया सुळे

# पिंपरी-चिंचवडमध्ये निवडणुकीचा धुराळा!

## कोल्हे-पवारांची भाजपवर तोफ

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीत आघाडी करण्याबाबत महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाशी चर्चा सुरू आहे. आघाडीबाबतचे चित्र दोन दिवसांत स्पष्ट होईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे निवडणूक प्रभारी, आमदार रोहित पवार यांनी दिली. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार असल्याबाबत मागील तीन वर्षांपासून बोलले जात आहे. पण, अशी कोणतीही चर्चा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**



राज्यातील मोठे उद्योजक शरद पवार यांना भेटत असतात. सामाजिक कामासंदर्भात त्यांची भेट होत असते. उद्योजक गौतम अदानी आणि शरद पवार यांच्या भेटीही सामाजिक कामाबाबतच असतात. त्यामुळे त्यांच्या भेटीचा संबंध राजकारणाशी जोडू नये असेही ते म्हणाले. कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासोबत चर्चा केली जाईल.चर्चेची माहिती प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे यांना दिली जाईल. त्यांनी मान्यता दिल्यानंतर खासदार डॉ.अमोल कोल्हे आघाडीची घोषणा करतील. आघाडीबाबतचे चित्र दोन दिवसांत स्पष्ट होईल. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत शरद पवार लक्ष घालत नाहीत, असेही ते म्हणाले. पिंपरी-चिंचवडमधील एका हेलिपॅडवर रोहित पवार यांच्या मोटारीची तपासणी करण्यात आली. याबाबत आमदार रोहित पवार म्हणाले, सत्ताधारी पक्षाचे नेते हेलिकॉप्टरमधून फिरताना काळ्या रंगाच्या मोठ्या पैशांच्या पिशव्या घेऊन फिरत असतात. पोलिसांनी त्यांची चौकशी केली पाहिजे. सत्ताधाऱ्यांऐवजी पोलीस आमच्या वाहनांची तपासणी करतात. त्यात लाडू, चिवड्याशिवाय काय सापडले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी राजीनामा दिला आहे. त्याबाबत विचारले असता आमदार पवार म्हणाले, प्रशांत जगताप प्रामाणिक कार्यकर्ते आहेत.

विचाराचे पक्के असून त्यांनी घेतलेला निर्णय त्यांचा व्यक्तीगत आणि भावनिक निर्णय आहे.भाजपच्या अनिर्बंध कारभाराविरोधात जनतेमध्ये रोष आहे. भाजप नेत्यांनी पिंपरी-चिंचवड शहराची विभागणी केली होती. भाजपचे स्थानिक नेतृत्व भ्रष्टाचारी असून त्यांना हद्दपार करण्याला प्राधान्य असणार आहे. घड्याळ चिन्हावर लढण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव आला नाही. प्रस्ताव आला तर वरिष्ठांशी चर्चा केली जाईल. राहुल कलाटे यांच्याशी चर्चा झाली. स्थानिक समीकरणाच्या दृष्टीने त्यांनी पाऊले टाकली आहेत. योग्य वाटले तो राजकीय निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यांचा निर्णय योग्य की अयोग्य आहे, हे येणारा काळ ठरवेल, असे खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणाले. महापालिका निवडणुकीत आघाडी करण्याबाबत महाविकास आघाडीतील घटक पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाशी चर्चा सुरू आहे. आघाडीबाबतचे चित्र दोन दिवसांत स्पष्ट होईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे निवडणूक प्रभारी, आमदार रोहित पवार यांनी दिली. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार असल्याबाबत मागील तीन वर्षांपासून बोलले जात आहे. पण, अशी कोणतीही चर्चा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केलेसामाजिक कामासंदर्भात त्यांची भेट होत असते. उद्योजक गौतम अदानी आणि शरद पवार यांच्या भेटीही सामाजिक कामाबाबतच असतात. त्यामुळे त्यांच्या भेटीचा संबंध राजकारणाशी जोडू नये असेही ते म्हणाले. कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षासोबत चर्चा केली जाईल.

### रोहितच्या मोटारीची तपासणी

चर्चेची माहिती प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे यांना दिली जाईल. त्यांनी मान्यता दिल्यानंतर खासदार डॉ.अमोल कोल्हे आघाडीची घोषणा करतील. आघाडीबाबतचे चित्र दोन दिवसांत स्पष्ट होईल. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकीत शरद पवार लक्ष घालत नाहीत, असेही ते म्हणाले. पिंपरी-चिंचवडमधील एका हेलिपॅडवर रोहित पवार यांच्या मोटारीची तपासणी करण्यात आली.

# मी प्रत्यक्षात दशावतार पाहिलाही नव्हता

## दिलीप प्रभावळकरांनी सांगितली भूमिका साकारण्यातील आव्हाने

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'दशावतार चित्रपटाची संकल्पना माझ्या मनाला भावली. दशावतार कला प्रकाराविषयी मी ऐकून होतो. प्रत्यक्षात मात्र हा कलाप्रकार कधीही पाहिला नव्हता. त्यामुळे चित्रपटातील बाबुली मेस्त्री ही भूमिका साकारण्याचे आव्हानच होते. या भूमिकेत काही तरी करण्यासारखे आहे, असे जाणवल्याने मी ही भूमिका स्वीकारली,' अशी भावना ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी व्यक्त केली.**



कोकणातील परंपरा, वारसा, संस्कृती, पर्यावरण रक्षण यावर भाष्य करणारा २०२५ मधील बहुचर्चित चित्रपट 'दशावतार' शंभर दिवसांचा नाबाद प्रवास पूर्ण करीत आहे. त्यानिमित्त कोहिनूर कट्टा प्रस्तुत 'दशावतार १००' या कार्यक्रमात चित्रपटातील कलाकारांशी संवाद आणि मान्यवरांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी दिलीप प्रभावळकर बोलत होते. कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते उपस्थितांचा सत्कार करण्यात आला.राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे कार्यकारी संचालक प्रकाश मगदूम, 'लागू बंधू'चे सारंग लागू, कार्यक्रमाचे संयोजक वीरेंद्र चित्राव या वेळी उपस्थित होते. दृक्-श्राव्य कार्यक्रमात दिलीप प्रभावळकर यांच्यासह दिग्दर्शक सुबोध खानोलकर, निर्माता सुजय हांडे, कलाकार सिद्धार्थ मेनन, प्रियदर्शनी इंदलकर, पर्यावरणतज्ज्ञ डॉ. गुरुदास नूलकर हे सहभागी झाले होते. त्यांच्याशी अजित भुरे यांनी संवाद साधला. या वेळी चित्रपट निर्मितीतील काही प्रसंग दाखविण्यात आले.बाबुली मेस्त्री' या भूमिकेसाठी शारीरिक, मानसिक आणि भावनिक तयारी करावी लागल्याचे सांगून प्रभावळकर पुढे म्हणाले, मानसिकता तयार करताना चित्रपटाची संहिता कामी आली.

### कलाकार काय म्हणतात ?

तर भावनिकता तयार करताना दिग्दर्शकाचे मार्गदर्शन आणि तरुण सहकलाकारांचे सहकार्य लाभले आणि त्यांच्यातील उत्साह व उर्जेची लागण झाली. चित्रपटातील भूमिकेसाठी स्वत:ला तयार करताना दशावताराचा प्रत्यक्ष प्रयोग पाहणे, त्यातील अनेक कलाकारांच्या भेटी घेणे तसेच दशावतारी कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा करणे तसेच मिताभिनय आणि जोरकस अभिनय यातील सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न केला. दशावतारी सादर करणाऱ्या कोकणातील मूळ कलाकारांनी हा चित्रपट पाहिल्यानंतर 'तुम्ही आमचे प्रतिनिधीत्व केले' अशी मिळालेली दाद माझ्यासाठी मोलाची ठरली.'

मतदानासाठी नागरिकांना प्रोत्साहन

पिंपरी चिंचवड महापालिका मेट्रो स्थानक येथे प्रवाशांसाठी

# मतदान जनजागृतीसाठी पथनाट्य व फ्लॅश मॉब!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत करण्यात आले आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका मेट्रो स्थानक येथे प्रवाशांसाठी मतदान जनजागृती पथनाट्य तसेच फ्लॅश मॉबचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून 'मतदान हा प्रत्येक नागरिकाचा हक्क व कर्तव्य आहे, तसेच प्रत्येक मत लोकशाही बळकट करण्यासाठी अमूल्य आहे' असा संदेश देत नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यात आले.**




पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केली असून, या निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेमार्फत महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली महापालिका हद्दीत स्वीप कार्यक्रमांतर्गत व्यापक मतदान जनजागृती मोहीम सुरू आहे.

या मोहिमेचा एक भाग म्हणून पिंपरी चिंचवड महापालिका मेट्रो स्थानक येथे मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. मेट्रो स्टेशनवरील प्रवासी, नागरिक व युवकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

**'मी मतदान करणार' केला निर्धार**

मेट्रो स्थानकावर राबविण्यात आलेल्या मतदान जनजागृती अभियानांतर्गत स्वाक्षरी मोहीम तसेच 'मी मतदान करणार...' असा संदेश देणारा विशेष सेल्फी पॉईंट उभारण्यात आला होता. या ठिकाणी मतदान करण्याची प्रतिज्ञा म्हणून स्वाक्षरी करण्यासाठी तसेच जनजागृतीचा संदेश देणारे सेल्फी काढण्यासाठी मेट्रो प्रवाशांची लगबग दिसून आली. या उपक्रमात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

> लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे. स्वीप उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या अशा नाविन्यपूर्ण जनजागृती उपक्रमांमुळे विशेषतः युवक व पहिल्यांदाच मतदान करणारे मतदार मोठ्या प्रमाणात मतदान प्रक्रियेत सहभागी होतील, असा विश्वास आहे.
> **-तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> मतदान जनजागृती ही केवळ एक मोहीम नसून ती लोकशाही संस्कृती रुजविण्याची प्रक्रिया आहे. सार्वजनिक ठिकाणी पथनाट्य, फ्लॅश मॉब, स्वाक्षरी मोहीम व सेल्फी पॉईंटसारख्या उपक्रमांमुळे नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश प्रभावीपणे पोहोचत असून, यामुळे मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल.
> **-अण्णा बोदडे,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# विद्यार्थ्यांसाठी प्रेम, संवाद आणि संस्कारांची शिदोरी!

## पालकांसाठी विशेष मार्गदर्शन; विद्या ए. पिल्लै, प्रियदर्शनी स्कुल मोशी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आपली लहान मुले म्हणजे आपल्या आयुष्यातील सर्वात मौल्यवान ठेवा आहेत. त्यांच्या मनाचा कोमलपणा, निरागसता आणि अमर्याद जिज्ञासा ही त्यांच्या वाढीची खरी ओळख आहे. कधी प्रश्नांनी भरलेले, कधी कल्पनांच्या विश्वात रमलेले, तर कधी नकळत चिंता व्यक्त करणारे हे बालमन सतत घडत असते. हे सारे अगदी स्वाभाविक आहे—कारण सक्रिय मनच शिकते, विचार करते आणि पुढे जाते. या सुंदर आणि नाजूक टप्प्यावर पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. दररोज थोडा वेळ मुद्दाम काढून मुलांशी संवाद साधणे फार गरजेचे आहे.**




"आज शाळेत काय शिकलास?"
"तुझी शिक्षिका कशी आहे?"
"मित्रांसोबत खेळायला मजा आली का?"
"डब्यातलं जेवण आवडलं का?"

अशा साध्या प्रश्नांमधूनच मुलांना आपले विचार, भावना आणि अनुभव मोकळेपणाने व्यक्त करण्याची संधी मिळते. हे छोटे संवाद त्यांच्या मनाला सुरक्षिततेची आणि आपुलकीची जाणीव देतात.

मुलांसोबत घालवलेला गुणवत्तापूर्ण वेळ हा त्यांच्या भावनिक विकासाचा पाया असतो. त्यांच्यासोबत गाणे म्हणणे, नाचणे, चित्र काढणे, गोष्टी सांगणे किंवा एखादी छोटी कृती एकत्र करणे—या सगळ्या गोष्टी नातेसंबंध अधिक घट्ट करतात. या प्रक्रियेत पालकांना मुलांच्या आवडी-निवडी, सुप्त गुण आणि कौशल्ये हळूहळू उमजू लागतात.

कल्पनाशक्ती ही मुलांच्या बौद्धिक आणि सर्जनशील विकासाची गुरुकिल्ली आहे. कागद, रंग, क्रेयॉन देऊन त्यांना मनमुराद चित्र काढू द्या, काहीतरी कल्पना करून मांडायला प्रोत्साहित करा. सुरुवातीला फारसे स्पष्ट दिसत नसेल तरी खचून जाऊ नका. सातत्याने दिलेले प्रोत्साहनच त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देते. कालांतराने त्यांच्या विचारांमध्ये, चित्रांमध्ये आणि शब्दांमध्ये सकारात्मक बदल नक्कीच जाणवेल.

पालक आणि मुलांमधील नात्याची खरी ताकद म्हणजे संवाद. दररोज किमान १५ ते ३० मिनिटे मुलांशी मनापासून बोलण्याची सवय लावा. जेव्हा हा संवाद नियमित होतो, तेव्हा मुले कोणतीही भीती न बाळगता सर्व गोष्टी शेअर करू लागतात. त्यांच्या प्रश्नांना संयमाने उत्तर द्या. गुंतागुंतीच्या गोष्टी सोप्या आणि सहज भाषेत समजावून सांगण्याचा प्रयत्न करा.

त्याचबरोबर, लहानपणा पासूनच मोठ्यांचा आदर, सौजन्य, दयाळूपणा आणि चांगले संस्कार रुजवणे अत्यंत आवश्यक आहे. बालपणी शिकलेली मूल्ये आयुष्यभर सोबत राहतात आणि मुलांना जबाबदार, संवेदनशील व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व घडवण्यास मदत करतात.

चला तर मग, आपण सर्वजण मिळून आपल्या नन्ह्या तारकांचा संगोपन करूया—प्रेमाने, संयमाने आणि समजूतदार मार्गदर्शनाने. कारण आज दिलेले संस्कारच उद्याचे उज्ज्वल भविष्य घडवतात.



## भूमिका

**मनुस्मृती जाळली गेली, तेव्हा केवळ काही पाने आगीत झोकून दिली गेली नव्हती, त्या ज्वाळांमध्ये हजारो वर्षांचा अन्याय, अपमान, बहिष्कार आणि मानसिक गुलामगिरी भस्मसात होत होती. तो क्षण एका ग्रंथा विरोधातील निव्वळ प्रतीकात्मक निषेध नव्हता, तर माणूस म्हणून जगण्याचा हक्क नाकारलेल्या कोट्यवधी शोषित, वंचित जीवांचा उसळलेला हुंकार होता.**

# मनुस्मृती दहनातून काय साधले?



महाड येथे २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बापूसाहेब (गंगाधर नीळकंठ) सहस्रबुद्धे आणि सहा अन्य सहकाऱ्यांच्या साथीने, मोठ्या जनसमुदायासमोर मनुस्मृती दहन करून मानवी समतेची पायाभरणी केली होती. ही ऐतिहासिक घटना म्हणजे स्वाभिमानाची,आत्मसन्मानाची आणि मानवतेची पडलेली ठिणगी होती.डॉ. आंबेडकर यांची ही कृती म्हणजे अत्यंत विचारपूर्वक केलेला निर्णय होता. ही प्रत्यक्ष कृती डिसेंबरच्या अखेरीला झाली असली तरी, एप्रिल १९२७ मध्ये डॉ. आंबेडकरांनी निपाणी येथील भाषणात, जाचक हिंदू ग्रंथ जाळूनच टाकले पाहिजेत असे म्हटले होते. डिसेंबरात त्यांनी मनुस्मृतीच्या रोखाने काही लेख लिहून अन्यायाच्या मुळांचा ऊहापोह केला होता. 'दुसऱ्या महाड परिषदे'त मनुस्मृती दहन हाच महत्त्वाचा कार्यक्रम ठरला, हे मात्र खरे.मनुस्मृती हा ग्रंथ इ.स.पूर्व सुमारे २०० ते इ.स. २०० या कालखंडात मनु नावाच्या ऋषी द्वारे रचला गेला,असे इतिहासतज्ज्ञ मानतात. या ग्रंथाने भारतीय समाजाला चार वर्णांमध्ये विभागून जन्माच्या आधारे माणसाचे मूल्य ठरवले. कर्तृत्व,बुद्धिमत्ता,श्रम किंवा नैतिकता यांना दुय्यम ठरवत जन्मालाच श्रेष्ठ–कनिष्ठतेचा निकष बनवण्यात आला. मनुस्मृतीने समाजाला शिकवले की काही लोक जन्मतःच श्रेष्ठ आहेत आणि काही लोक जन्मतःच नीच.ही कल्पना इतकी खोलवर रुजवली गेली की माणसाची ओळख त्याच्या कर्माने नव्हे,तर त्याच्या जातीने ठरवली जाऊ लागली.मनुस्मृतीतील श्लोक हे या अमानवी व्यवस्थेचे थेट पुरावे आहेत. उदाहरणार्थ, मनुस्मृती ८.४१३ मध्ये "शूद्राने वेद ऐकले, तर त्याच्या कानात उकळते शिसे ओतावे." अशा शब्दांत केवळ शिक्षणबंदीचे समर्थन केलेले नसून ज्ञानाच्या आकांक्षेलाही गुन्हा ठरवलेले आहे. आपल्याकडे शिक्षण हे मुक्तीचे साधन न राहता वर्चस्व टिकवण्याचे हत्यार बनले, ते अशा मानसिकतेमुळेच. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' सारखी (मनुस्मृती ९.३) वचने सर्वपरिचित आहेतच पण 'स्त्रीने बालपणी पित्याच्या, तरुणपणी पतीच्या आणि वृद्धावस्थेत पुत्राच्या आधीन राहावे' असे सांगणाऱ्या या कायद्यांनी जसे स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्वच नाकारले, तसेच शूद्रांची मानवी प्रतिष्ठा नाकारली. या ग्रंथाने लोकांच्या जीवनात जे विष कालवले,ते फक्त शारीरिक नव्हते,तर मानसिक होते. न्यूनगंड, भीती, आत्मतिरस्कार आणि लाचारी पिढ्यान्‌पिढ्या मनात रुजवली गेली. अस्पृश्यतेच्या नावाखाली माणसामाणसांत इतक्या भिंती उभ्या राहिल्या की एकाच मातीत जन्मलेले लोक एकमेकांच्या सावलीलाही घाबरू लागले. विहिरीवर पाणी नाकारले गेले, मंदिरांचे दरवाजे बंद झाले, शाळांच्या उंबरठ्यावरून मुले परत पाठवली गेली, हे सगळे मनुस्मृतीच्या विचारांचे जिवंत परिणाम होते.या व्यवस्थेचा देशावरही भीषण परिणाम झाला. भारताच्या प्राचीन व मध्ययुगीन काळात मनुस्मृतीमुळे समाजाची प्रचंड प्रमाणात विभागणी झाली होती. आधुनिक काळात १९०१ च्या ब्रिटिश जनगणनेनुसार भारतातील एकूण साक्षरता केवळ सुमारे पाच टक्के होती, तर दलित व मागास समाजातील साक्षरता १ टक्क्यांपेक्षाही कमी होती.बहुसंख्य समाज अज्ञानात ठेवला गेल्यामुळे देशाची बौद्धिक, वैज्ञानिक आणि सामाजिक प्रगती खुंटली. समाज एकसंध होऊ शकला नाही आणि म्हणूनच भारत शतकानुशतके परकीय सत्तांच्या अधीन राहिला. अंतर्गत भेदभावाने राष्ट्राची शक्ती आतूनच पोखरली.अशा अंधारात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रकाशस्तंभासारखे उभे राहिले. त्यांनी मनुस्मृतीकडे धर्मग्रंथ म्हणून नव्हे, तर गुलामगिरीचा लिखित जाहीरनामा म्हणून पाहिले. त्यांच्या मते हा ग्रंथ ईश्वरप्रणीत नसून माणसाने माणसावर केलेल्या अन्यायाचे समर्थन करणारा दस्तऐवज होता. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की मनुस्मृती जाळणे म्हणजे धर्म नष्ट करणे नाही.

## प्रासंगिक »

### किमत मोजून विकास?

***विकास करताना त्यात फायदा किती, नुकसान किती आणि हे नुकसान पैशापेक्षा पर्यावरणीय आणि मानवी जीवनाला हानीकारक किती याचा सर्वंकष विचार करायला हवा.***

अरवली पर्वतरांगातील पर्यावरणाचा मुद्दा सध्या केंद्रस्थानी आला आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे एमआयडीसीतील एका प्रकल्पाबाबत जगभर चर्चा होत असली, तरी महाराष्ट्र सरकार मात्र त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. कोकणात एकतर गुंतवणूक होत नाही, झाली तर पर्यावरणाला नख लावणारी असते. कोकणी लोकांचा आवाज सध्या तरी दडपलेला दिसतो. पूर्वी जशा संघटना एकत्र येऊन एखाद्या विषयाला विरोध करायच्या, तसा विरोध आता होत नाही. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील लोटे येथील घनदाट हिरवी जंगले आणि गंजलेल्या लाल टेकड्या जिथे एकमेकींना भेटतात त्याची यंत्रसामग्री नवी नाही. विसेन्झा येथील 'मिटेनी' कारखान्याचा भाग आहे. इटलीतील अलीकडील इतिहासातील सर्वात वाईट पर्यावरणीय घोटाळ्यांपैकी एक म्हणून मिटेनी प्रकल्पाचा उल्लेख केला जातो.

वाढता उत्पादन खर्च, रासायनिक खतांवरील वाढते अवलंबित्व, मातीची खालावलेली सुपीकता आणि पर्यावरणीय -हास या साऱ्या समस्यांनी शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. अशा परिस्थितीत जर कमी खर्चात, पर्यावरणस्नेही आणि दीर्घकालीन परिणाम देणारा पर्याय उपलब्ध झाला.

# ॲग्रो होमिओपॅथीचा नवा प्रवाह



गो ड बारीक गोळ्या आणि मुळासकट आजाराचे उच्चाटन करण्यासाठी प्रभावी मानली जाणारी होमिओपॅथी उपचाराची पद्धत आता शेतीतही अमलात आणली जात आहे. कृषी क्षेत्रात त्याचा यशस्वीपणे वापर केला, तर अनेक समस्यांवर तोडगा काढणे शक्य राहू शकते, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. ही पद्धत नजीकच्या काळात रासायनिक कीटकनाशके आणि खतांना पर्याय देणारी ठरू शकते. या माध्यमातून पिकांच्या उत्पादनात वाढ, किडीचा प्रादुर्भाव रोखणे आणि कृषी क्षेत्राचा सर्वंकष विकास करण्यासाठी उपयुक्त माध्यम ठरू शकते.भारतात याद्दष्टीने अनेक संशोधने केली जात असून प्रयोगही केले जात आहेत. जाणकारांच्या मते, या पद्धतीत रोपट्यांना अंतर्गत रूपातून मजबूत करण्यावर भर दिला जातो, जेणेकरून नैसर्गिक रूपाने रोगराईचा मुकाबला करणे शक्य होते. कृषी होमिओपॅथीमुळे मातीत मिसळल्या जाणाऱ्या रासायनिक खतांमुळे होणारे नुकसान टाळले जाते. मातीतील अवशेषांचा समूळ नायनाट होतो आणि शेवटी मातीची सुपिकता वाढण्यास मदत होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महागड्या आणि पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत कमी असणारा खर्च. यामुळे कृषी क्षेत्रात होमिओपॅथीचा वापर हा नक्कीच क्रांतिकारी पाऊल ठरू शकतो. ॲग्री होमिओपॅथी रोपट्यांना सक्षम करण्याबरोबरच अंतर्गत प्रक्रियादेखील मजबूत करते. रोपट्यांची सर्वंकष वाढ होऊन ती नैसर्गिक रूपानेदेखील आपोआप किडीचा सामना करण्यास सक्षम बनतात. या सुविधेमुळे महागड्या आणि गरजेच्या वेळी उपलब्ध न होणाऱ्या रासायनिक खतांचा वापर करण्याची गरज भासत नाही. एखाद्या आजाराला मुळासकट काढण्याचे काम होमिओपॅथी उपचार पद्धतीत आहे. तीच मात्रा इथेही लागू केली जाईल. हाच सिद्धांत माती आणि रोपट्यांना लागू होतो. होमिओपॅथी ही अनुवांशिक हालचाली आणि चयापचय म्हणजेच 'मेटाबालिज्म 'च्या बदलातील प्रक्रियेला प्रोत्साहित करून पिकांची प्रतिकार शक्ती वाढवण्यास मदत करते. कृषी क्षेत्रात होमिओपॅथी औषधांचा वापर अनेक दशकांपासून होत आहे आणि तो यशस्वीही ठरला आहे; मात्र त्याचा वापर मर्यादित आहे; पण आता यासंदर्भात जगभरात संशोधन वाढले असून लोकांना त्याविषयी जिज्ञासा वाढली आहे. परिणामी, सर्व पातळ्यांवर त्याची चर्चा होताना दिसत आहे. एखादा रुग्ण होमिओपॅथी डॉक्टरकडे जातो तेव्हा त्याच्यावर परिणामकारक उपचार केले जातात आणि त्या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न होतो.यानुसार जागतिक पातळीवर होमिओपॅथीचे नवे रूप म्हणून 'ॲग्रो होमिओपॅथी कडे पाहता येईल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**यांची निष्ठा आहे कुठे ?**

## सर्व पक्षातील नेत्यांना मुलांसाठी पालिका तिकिटे

# सर्व पक्षाचा फुटणार पोळा!

## ठाकरेंचे दोन माजी महापौर भाजपात

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात महापालिका निवडणुकीसाठी येत्या दोन दिवसात उमेदवार याद्या जाहीर होताच सगळ्या राजकीय पक्षात मोठा पोळा फुटणार असून त्याची सुरुवात आज नाशिक मधून झाली आहे. ठाकरे गटाच्या दोन माजी महापौरांनी ठाकरेंची साथ सोडत भाजपला जवळ केले आहे.**



२३ तारखेपासून नामांकन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असली तरी अजून कोणत्याही प्रमुख पक्षाने उमेदवार यादी जाहीर केली नाही म्हणून कुणी नामांकन दाखल करताना दिसत नाहीत. दुसरीकडे या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी कोणत्या मनपात कोणत्या पक्षासोबत जाणार आहे याचा कुणालाही अंदाज लागत नाही अशी स्थिती तयार झाल्याने कार्यकर्ते संभ्रमात पडले आहेत.. भाजप,शिवसेना आणि राष्ट्रवादी या प्रमुख पक्षात नेत्यांना आपल्या मुलांना तिकिटे देऊन त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची घाई झालेली दिसत असताना पक्षातून या घराणेशाहीला विरोध होताना दिसत आहे. काँग्रेस आणि भाजप संसदीय मंडळाची बैठक आज आणि उद्या होत असल्याने या दोन्ही प्रमुख पक्षाच्या मनपा उमेदवारांच्या याद्या दोन तीन दिसवात जाहीर होण्याची शक्यता आहे त्यामुळे निवडणुकीच्या धामधुमीला अजून खरी सुरुवात झाली नाही. तिकडे नाशिक मध्ये ठाकरे गटाचे माजी महापौर यतीन वाघ आणि विनायक पांडे यांनी पक्ष सोडण्याची घोषणा करीत आज भाजपमध्ये प्रवेश घेतलं आहे.नाशिक मधील ज्या दोन माजी महापौरांनी ठाकरे बंधू एकत्र आल्यावर भगवा हातात घेत डान्स केला त्यांना अवघ्या बारा तासात असे काय झाले की त्यांनी पक्ष सोडला अशी विचारणा करीत ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी या नेत्यांच्या निष्ठा

### मोठा पोळा फुटणार

त्यांना अवघ्या बारा तासात असे काय झाले की त्यांनी पक्ष सोडला अशी विचारणा करीत ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी या नेत्यांच्या निष्ठा नेमक्या आहेत कुठे असा सवाल केला आहे. २३ तारखेपासून नामांकन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असली तरी अजून कोणत्याही प्रमुख पक्षाने उमेदवार यादी जाहीर केली नाही म्हणून कुणी नामांकन दाखल करताना दिसत नाहीत.

नेमक्या आहेत कुठे असा सवाल केला आहे. राज्यात महापालिका निवडणुकीसाठी येत्या दोन दिवसात उमेदवार याद्या जाहीर होताच सगळ्या राजकीय पक्षात मोठा पोळा फुटणार असून त्याची सुरुवात आज नाशिक मधून झाली आहे. ठाकरे गटाच्या दोन माजी महापौरांनी ठाकरेंची साथ सोडत भाजपला जवळ केले आहे. दुसरीकडे या निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी कोणत्या मनपात कोणत्या पक्षासोबत जाणार आहे याचा कुणालाही अंदाज लागत नाही अशी स्थिती तयार झाल्याने कार्यकर्ते संभ्रमात पडले आहेत.. भाजप,शिवसेना आणि राष्ट्रवादी या प्रमुख पक्षात नेत्यांना आपल्या मुलांना तिकिटे देऊन त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्याची घाई झालेली दिसत असताना पक्षातून या घराणेशाहीला विरोध होताना दिसत आहे. काँग्रेस आणि भाजप संसदीय मंडळाची बैठक आज आणि उद्या होत असल्याने या दोन्ही प्रमुख पक्षाच्या मनपा उमेदवारांच्या याद्या दोन तीन दिसवात जाहीर होण्याची शक्यता आहे त्यामुळे निवडणुकीच्या धामधुमीला अजून खरी सुरुवात झाली नाही. तिकडे नाशिक मध्ये ठाकरे गटाचे माजी महापौर यतीन वाघ आणि विनायक पांडे यांनी पक्ष सोडण्याची घोषणा करीत आज भाजपमध्ये प्रवेश घेतलं आहे.नाशिक मधील ज्या दोन माजी महापौरांनी ठाकरे बंधू एकत्र आल्यावर भगवा हातात घेत डान्स केला.

# निवडणुकीसाठी ७५ हजार कर्मचाऱ्यांची फौज

## प्रशिक्षणास गैरहजर राहिल्यास फौजदारी कारवाईचा इशारा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी तब्बल ७५ हजार कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे. त्यापैकी सुमारे ५८ हजार कर्मचाऱ्यांना आदेश देण्यात आले असून त्यांचे प्रशिक्षण २९ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. निवडणूकविषयक कामाच्या प्रशिक्षणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात मुंबई महापालिका अधिनियमातील कलम २८ (क) अन्वये फौजदारी कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.**

मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी अवघे २० दिवस उरले असून महापालिका प्रशासन निवडणुकीच्या कामात व्यग्र आहे. मुंबई महापालिकेची व्याप्ती मोठी असून एकूण २२७ प्रभागांमध्ये ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी तब्बल १० हजाराहून अधिक मतदान केंद्रे असतील. विधानसभा निवडणुकीसाठी एकूण १० हजार १११ मतदान केंद्रे होती. तर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदान केंद्रामध्ये वाढ होणार असून एकूण ११ हजार १२२ मतदान केंद्रे तयार करावी लागणार आहे. त्यामुळे या निवडणुकीसाठी मुंबई महापालिकेला मोठ्या प्रमाणावर कर्मचारी लागणार



आहेत.निवडणुकीच्या कामासाठी एकूण ७५ हजार कर्मचारी लागणार असले तरी त्यापैकी सुमारे दहा हजार कर्मचाऱ्यांनाच सध्या निवडणुकीचे काम देण्यात आले आहे. तर उर्वरित कर्मचारी मतदानाच्या आदल्या दिवशी व मतदानाच्या दिवशी कार्यरत असतील. सुमारे ५८ हजार कर्मचाऱ्यांना आतापर्यंत आदेश देण्यात आले असून त्यांचे प्रशिक्षण २९ डिसेंबरपासून सुरू होत आहे. प्रशिक्षण सत्र सहा दिवस चालणार असून प्रत्येक दिवशी

### कर्तव्यावर हजर राहण्याचे आदेश

निवडणुकीच्या कामासाठी ४१ हजार ९८० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यात यंदा वाढ झाली आहे.पालिका प्रशासनाने निवडणूक कर्तव्यावर हजर राहण्याचे आदेश कर्मचाऱ्यांना आदेश दिले आहेत. तसेच हे आदेश रद्द करण्यासाठी किंवा फेरबदल करण्यासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

सुमारे दहा हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे कर्मचारी मतदानाच्या आदल्या व मतदानाच्या दिवशी कार्यरत राहतील, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.दरम्यान, निवडणुकीच्या कामासाठी नेहमीप्रमाणे कर्मचाऱ्यांनी, विशेषतः शिक्षकांनी विरोध केला आहे. मात्र या कामासाठी विभाग कार्यालयातून प्रत्येकी ४० ते ४५ कर्मचारी मागवण्यात आले आहेत. तर मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागातून सुमारे १५ ते २० शिक्षक कर्मचारी घेण्यात आले आहेत. तर आरोग्य विभागातील फक्त लिपिकांना निवडणुकीच्या कर्तव्यासाठी घेण्यात आल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबई महापालिकेच्या २०१७ मधील निवडणुकीसाठी एकूण ७३०४ मतदान केंद्रे होती.

## उदयपूरमध्ये ही घटना घडली — कंपनीच्या सीईओसह तिघांना करण्यात आली अटक

# महिला मॅनेजरवर कारमध्ये बलात्कार

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उदयपूर पोलिसांनी एका खासगी कंपनीच्या तीन कर्मचाऱ्यांना सामूहिक बलात्कार प्रकरणात अटक केली आहे. कारमध्ये या तिघांनी एका महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप आहे. अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी एक कंपनीचा सीईओ आहे. ज्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाला ती महिला कंपनीची कार्यकारी प्रमुख होती. चालत्या कारमध्ये तिच्यावर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे.**

## घरी नेण्याच्या बहाण्याने कारमध्ये बसवले



पोलीस अधीक्षक योगेश गोयल यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार ही घटना २१ डिसेंबरची आहे. या महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. तिच्यावर लैंगिक अत्याचार झाले आहेत. सीईओचा वाढदिवस असल्याने पार्टी होती. ती साजरी करुन येत असताना ही घटना घडल्याची माहितीही गोयल यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पार्टी रात्री उशिरापर्यंत सुरु होती. त्यानंतर सीईओसह एकूण तिघांनी इतरांना जायला सांगितलं. त्यावेळी ही महिला त्यांच्यासह एकटीच होती. यानंतर आरोपींनी सदर महिलेला कारची लिफ्ट दिली.

आम्ही तुला तुझ्या घरी सोडतो असं सांगितलं. त्यानंतर या महिलेवर बलात्कार करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पीडित महिलेने पोलिसात तक्रार नोंदवली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २३ डिसेंबरला घटनेची तक्रार नोंदवण्यात आली.

ती मॅनेजर पदावर काम करत होती. त्यामुळे तिच्या सर्व जण ओळखीचे होते. त्यामुळे ती ही बिनधास्त पार्टीला गेली. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या पार्टीत मद्यप्राशन करण्यात आले. सर्वांनी दारू घेतली होती.

पीडित तरुणीने ही दारू घेतली होती. त्यामुळे पीडित महिला मॅनेजरची प्रकृती बिघडली. त्यामुळे तिला घरी सोडण्याच्या बहाण्याने आरोपींनी स्वतःच्या कारमध्ये तिला बसवलं. कारमध्ये कंपनीची महिला एक्झिक्युटिव्ह हेड, तिचा पती आणि सीईओ उपस्थित होते.

त्यांनी तिला घरी नेण्याच्या बहाण्याने कारमध्ये बसवले. वाटेत तिला सिगारेटमधून अमली पदार्थ देण्यात आला. ज्यामुळे ती बेशुद्ध पडली. या स्थितीचा फायदा घेत आरोपींनी तिच्यावर आळीपाळीने धावत्या कारमध्येच अत्याचार केला. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त

## २३ डिसेंबरला घटनेची तक्रार

यानंतर आरोपींनी सदर महिलेला कारची लिफ्ट दिली. आम्ही तुला तुझ्या घरी सोडतो असं सांगितलं. त्यानंतर या महिलेवर बलात्कार करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पीडित महिलेने पोलिसात तक्रार नोंदवली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २३ डिसेंबरला घटनेची तक्रार नोंदवण्यात आली. ती मॅनेजर पदावर काम करत होती.

दिलं आहे.पीडित तरुणी शुद्धीवर आली. त्यावेळी तिला आपल्या सोबत काही तरी चुकीचे झाले असल्याचं अंदाज आला. आपल्यावर अत्याचार झाल्याचं तिला समजलं. त्यामुळे ती हादरून गेली. अत्याचार करणारे आपल्याच ऑफीसमधील होते हे ही तिच्या लक्षात आले.

त्यानंतर तिने वेळ न घालवता पोलिसांत धाव घेतली. शिवाय या लोकां विरोधात तक्रार नोंदवली. उदयपूर पोलिसांनी एका खासगी कंपनीच्या तीन कर्मचाऱ्यांना सामूहिक बलात्कार प्रकरणात अटक केली आहे. कारमध्ये या तिघांनी एका महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याचा आरोप आहे.

अटक करण्यात आलेल्या तिघांपैकी एक कंपनीचा सीईओ आहे. ज्या महिलेवर सामूहिक बलात्कार झाला ती महिला कंपनीची कार्यकारी प्रमुख होती. चालत्या कारमध्ये तिच्यावर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे.

पोलीस अधीक्षक योगेश गोयल यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीनुसार ही घटना २१ डिसेंबरची आहे. या महिलेची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. तिच्यावर लैंगिक अत्याचार झाले आहेत. सीईओचा वाढदिवस असल्याने पार्टी होती. ती साजरी करुन येत असताना ही घटना घडल्याची माहितीही गोयल यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पार्टी रात्री उशिरापर्यंत सुरु होती. त्यानंतर सीईओसह एकूण तिघांनी इतरांना जायला सांगितलं. त्यावेळी ही महिला त्यांच्यासह एकटीच होती.

# बांगलादेशमध्ये आणखी एका हिंदूची हत्या

## राजबारी जिल्ह्यातील हिंदू युवकाचा जमावाच्या मारहाणीत मृत्यू

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशमध्ये उसळलेल्या हिंसाचारात हिंदूंना लक्ष्य करण्याच्या घटना घडत आहे. काही दिवसांपूर्वी गारमेंट कंपनीत काम करणाऱ्या दीपू चंद्र दास या युवकाची जमावाने मारहाण करत निर्घृण हत्या केली होती. त्यानंतर आता राजबारी जिल्ह्यात बुधवारी रात्री उशीरा गावातील जमावाने एका हिंदू तरुणाला मारहाण करत ठार केल्याचे वृत्त डेली स्टारने पोलीस सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.**

मैमनसिंग येथील भालुका परिसरातील २७ वर्षीय दीपू चंद्र दासची हत्या ईशनिंदेच्या आरोपाखाली करण्यात आली होती. त्यानंतर आता ही दुसरी घटना घडल्याचे कळते. दीपू चंद्र दासची हत्या झाल्यानंतर त्याचे पडसाद संपूर्ण भारतभर उमटले होते. अनेकांनी या घटनेचा निषेध करत बांगलादेशमधील राजकीय अस्थिरतेवर चिंता व्यक्त केली होती.डेली स्टारच्या वृत्तानुसार, बुधवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास स्थानिक गावकऱ्यांनी एका व्यक्तीवर हल्ला केल्याची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले, अशी माहिती पांगशा सर्कलचे सहाय्यक पोलीस अधीक्षक देब्रता सरकार



यांनी दिली.पीडित तरूणाचे नाव अमृत मंडल असल्याची माहिती मिळत आहे. अमृत याच गावातील रहिवासी होता. मारहाणीत त्याला गंभीर दुखापत झाल्याचे कळताच पोलिसांनी त्याला पांगशा उपजिल्हा रुग्णालयात हलवले. मात्र पहाटे २ वाजता त्याचा मृत्यू झाला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमृत मंडलला या गावात सम्राट या नावाने ओळखले जात होते. त्याच्यावर किमान दोन गुन्हे दाखल होते. या भागात सम्राट वाहिनी नावाने

## बांगलादेशमध्ये राजकीय अस्थिरता

दीपूच्या हत्येची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. परंतु, तोपर्यंत हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झालेले होते.भारताच्या सीमेला लागून असलेल्या बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा हिंसाचाराची ठिणगी पडली. विद्यार्थी नेते शरीफ उस्मान हादी यांच्या मृत्यूनंतर राजधानी ढाकामध्ये हिंसक आंदोलने झाली.

ओळखल्या जाणाऱ्या गटाचा तो नेता होता. या गटाच्या माध्यमातून तो आणि त्याचे साथीदार खंडणी उकळत असत, असा आरोप होत आहे. स्थानिकांचा हवाला देत पोलिसांनी सांगितले की, मंडल गावकऱ्यांना धमकावून त्यांच्याकडून बळजबरीने हप्तावसुली करत होता. भारतात काही काळ राहिल्यानंतर तो अलीकडेच पुन्हा या गावात परतला असल्याचे सांगितले जाते.बांगलादेशमधील मैमनसिंह जिल्ह्यात गुरुवारीअधिकारी अब्दुल मलिक यांनी बीबीसी बांग्लाला सांगितले की, दीपूची हत्या केल्यानंतर जमावाने त्याचा मृतदेह ढाका-मयमनसिंग महामार्गाच्या बाजूला टाकला आणि त्याला आग लावली.

# जिला फक्त त्याचे पैसे हवे आहेत

गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा वर्षभरापासून घटस्फोटाच्या अफवांमुळे चर्चेत आहेत. गोविंदाचे एका मराठी अभिनेत्रीबरोबर विवाहबाह्य संबंध आहेत, अशीसुद्धा चर्चा होती. सुनीता यांनी आता त्यांच्या पतीच्या विवाहबाह्य संबंधाबद्दल स्वत: सांगितलं आहे.'ई टाइम्स'शी संवाद साधताना सुनीता यांनी २०२५ हे वर्ष त्यांच्यासाठी कसं गेलं याबद्दल सांगितलं आहे. सुनीता म्हणाल्या, "२०२५ माझ्यासाठी फार वाईट वर्ष होतं." यावेळी त्यांनी गोविंदाच्या विवाहबाह्य संबंधाचा उल्लेखही केला. त्यांनी गोविंदा ज्या महिलेला डेट करीत आहे, ती अभिनेत्री नसल्याचं स्पष्ट केलं. सुनीता याबद्दल म्हणाल्या, "तिचं त्याच्यावर प्रेम नाहीये, तर तिला फक्त त्याचे पैसे हवे आहेत." सुनीता यांना पुढे २०२६ मध्ये तुम्हाला कोणत्या गोष्टी बदलायच्या आहेत. असं विचारल्यानंतर त्या म्हणाल्या, "मला गोविंदानं या सगळ्या अफवा, गोष्टींचा शेवट करावा, असं वाटतं. मला २०२६ मध्ये माझं सुखी, आनंदी कुटुंब हवं आहे."सुनीता यांनी पुढे सांगितलं की, गोविंदाला समजलं आहे की, त्याच्या आयुष्यात फक्त तीनच स्त्रिया महत्त्वाच्या आहेत. एक त्याची आई, दुसरी पत्नी व तिसरी त्याची मुलगी. यावेळी त्या म्हणाल्या, "कोणालाही याव्यतिरिक्त चौथ्या स्त्रीला त्याच्या आयुष्यात स्थान देण्याचा अधिकार नाही." सुनीता पुढे म्हणाल्या, "गोविंदानं त्याच्याबरोबर फक्त पैशांसाठी असणाऱ्या माणसांपासून दूर राहिलं पाहिजे."

# दीपू दासच्या हत्येनंतर जान्हवीने व्यक्त केला संताप

बांगलादेशमधील मैमनसिंग जिल्ह्यातील भालुका येथे दीपू चंद्र दास या हिंदू तरुणाची जमावाकडून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या अमानवीय घटनेप्रकरणी सध्या जगभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. बांगलादेशातील हिंसाचारावर अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. याप्रकरणावर आता अभिनेत्री जान्हवी कपूरने पोस्ट शेअर संताप व्यक्त केला आहे. जान्हवी कपूर पोस्टच्या सुरुवातीलाच दीपू चंद्र दास याचा उल्लेख करत लिहिते, "बांगलादेशमध्ये जे काही घडतंय ते अतिशय क्रूर आहे. ही एकमेव घटना नसून हा नरसंहार आहे. जर तुम्हाला अमानुष मॉब लिंचिंगबद्दल माहिती नसेल तर सर्वप्रथम त्याबद्दल वाचा, व्हिडीओ पाहा, प्रश्न विचारा...आणि या सगळ्यानंतरही जर तुमच्या मनात संताप निर्माण होत नसेल, तर हाच ढोंगीपणा एके दिवशी आपल्याला संपवून टाकेल. इथे आपल्या शेजारी असलेल्या भावा-बहिणींना जाळून मारलं जातंय पण, आपण जगाच्या दुसऱ्या टोकावर घडणाऱ्या घटनांसाठी राग व्यक्त करतो, त्याबद्दल आपल्याला वाईट वाटतं. मानवतेचं विस्मरण होण्यापूर्वी अशाप्रकारच्या प्रत्येक हल्ल्याचा आपण निषेध केला पाहिजे. या घटनांचा तीव्र विरोध केला पाहिजे."जान्हवी कपूरप्रमाणे मनोरंजनविश्वातील अन्य काही सेलिब्रिटींनी सुद्धा बांगलादेशातील हिंदू तरुणाच्या हत्येविरोधात आवाज उठवला आहे. दिया मिर्झा, रवीना टंडन यांनीही यासंदर्भात पोस्ट शेअर केल्या होत्या.

# नाच गं घुमा!



परेश मोकाशी यांची चित्रपट दिग्दर्शित करण्याची आणि तो हाताळण्याची एक वेगळी हातोटी आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'पासून 'वाळवी'पर्यंत हे आपण लक्षात घेतलं आहेच. आता त्यांचा नवा चित्रपट आला आहे ज्याचं नाव आहे 'नाच गं घुमा' मुक्ता बर्वे, नम्रता संभेराव, सुकन्या मोने, सुप्रिया पाठारे, शर्मिष्ठा राऊत, सारंग साठे यांच्या प्रमुख भूमिका असलेला चित्रपट आहे.चित्रपटाची कथा उच्च मध्यमवर्गीय त्रिकोणी घरात घडते. घरात कामासाठी बाई आली नाही किंवा वेळेवर आली नाही किंवा तिने सुट्टीच घेतली तर काय? या आजकालच्या नोकरी करणाऱ्या गृहिणीपुढे पडलेल्या प्रश्नांवर हा चित्रपट आधारलेला आहे. राणी (मुक्ता बर्वे) आणि आनंद (सारंग साठे) यांना शाळेत जाणारी एक मुलगी चिकू (मायरा वायकूळ) आहे. या दोघांनाही नोकरीसाठी जावं लागत असल्याने चिकूला सांभाळण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बारा तास काम करणारी बाई त्यांना हवी आहे. आशाताई (नम्रता संभेराव) या त्यांच्याकडे येतात. पण त्या वेळ पाळत नसतात. म्हणून राणी त्यांना कामावरुन काढून टाकते. पण मग राणी आणि आनंदची पंचाईत होऊ लागते, पण आशाताईंना परत काम दिलं जातं. आधी वेळ न पाळणाऱ्या आशाताई वेळेवर येऊ लागतात. नंतर एके दिवशी एक घटना घडते ज्यानंतर राणी अक्षरशः हाताला धरुन हाकलून देते. या सगळ्यानंतर काय काय घडतं?, आशाताई असं काय वागतात? राणीचं काय होतं? आनंदची भूमिका काय? या दोघांच्याही आया घरात राहण्यासाठी येतात तेव्हा काय होतं ? या सगळ्यावर सिनेमा भाष्य करतो.

# 'या' अभिनेत्रीची नेटवर्थ माहितीये का?

अनेकदा अभिनेत्री लग्नानंतर किंवा मुलांचा जन्म झाल्यानंतर अभिनय क्षेत्रातून ब्रेक घेताना दिसतात. यावेळी त्या त्यांच्या खासगी आयुष्यावर लक्ष केंद्रित करतात. यापैकीच एक अभिनेत्री म्हणजे श्रद्धा आर्या. 'झी टीव्ही'वरील 'कुंडली भाग्य' या मालिकेतून घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे श्रद्धा. श्रद्धा सध्या अभिनय क्षेत्रापासून दूर असली तरी सोशल मीडियावर मात्र ती सक्रिय असते आणि तिचा तिथेही मोठा चाहता वर्ग आहे. 'कुंडली भाग्य' मालिकेतील प्रीता या भूमिकेमुळे तिला प्रेक्षकांची पसंती मिळाली. पण, अभिनय क्षेत्रापासून दूर असलेल्या श्रद्धा आर्याची नेटवर्थ किती आहे तुम्हाला माहीत आहे का? हिंदी टेलिव्हिजनवर काम करणाऱ्या अनेक कलाकारांचा पर डे किती असतो, त्यांना किती मानधन मिळतं याबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता प्रेक्षकांमध्ये नेहमी असते. चला तर जाणून घेऊयात श्रद्धा आर्याच्या नेटवर्थबद्दल. श्रद्धा आर्याने फक्त मालिकांमध्येच नाही तर काही चित्रपटांमध्येही काम करत कोट्यवधींची संपत्ती जमवली आहे. 'एबीपी'च्या वृत्तानुसार श्रद्धा आर्याची नेटवर्थ ४४ कोटी इतकी आहे, तर श्रद्धा आर्या मालिकेच्या एका एपिसोडचे एक लाख रुपये इतकं मानधन घेते. श्रद्धा आर्या टेलिव्हिजनवरील मालिका व्यतिरिक्त ब्रँड इंडोर्समेंट आणि सोशल मीडियावरूनही पैसे कमावते. तिच्याकडे आलिशान गाड्यांचं कलेक्शन आहे. श्रद्धा आर्याच्या गाड्यांच्या कलेक्शनबद्दल बोलायचं झालं तर तिच्याकडे मर्सिडीज बेंझ जीएलसी ही गाडी आहे, जिची किंमत ५८.६० लाख रुपये इतकी आहे. यासह तिच्याकडे मर्सिडीज बेंझ ई क्लास ए ३५०D ही महागडी गाडी आहे, जिची किंमत ८२ लाख रुपये इतकी आहे. दरम्यान, श्रद्धा आर्या हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे.



# गायत्री लवकरच बोहल्यावर चढणार

मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. पूजा बिरारी, प्राजक्ता गायकवाड, अनुष्का पिंपुटकर अशा अनेक अभिनेत्री यंदाच्या वर्षी लग्नबंधनात अडकल्या. तर, ज्ञानदा रामतीर्थकरचा नुकताच साखरपुडा पार पडल्याचं पाहायला मिळालं. आता या पाठोपाठ आणखी एका अभिनेत्रीने चाहत्यांबरोबर लग्न ठरल्याची आनंदाची बातमी शेअर केली आहे. तसेच सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत तिने आपल्या होणाऱ्या नवऱ्याची ओळखही सर्वांना करून दिली आहे. 'तुला पाहते रे' या मालिकेमुळे घराघरांत लोकप्रिय झालेली अभिनेत्री गायत्री दातार आता लवकरच बोहल्यावर चढणार आहे. काही दिवसांपूर्वीच "माझ्या आयुष्यात हिरोची एन्ट्री झालेली आहे" असं कॅप्शन देत गायत्रीने सोशल मीडियावर प्रेमाची कबुली दिली होती. मात्र, अभिनेत्रीने तिच्या होणाऱ्या नवऱ्याचा चेहरा रिव्हिल केला नव्हता. गायत्रीच्या खऱ्या आयुष्याचा 'हिरो' नेमका कोण आहे? हे जाणून घेण्यासाठी तिचे चाहते आतुर झाले होते. अखेर ख्रिसमसच्या दिवशी तिने आपल्या होणाऱ्या नवऱ्याची ओळख सर्व चाहत्यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून करून दिली आहे.गायत्री पोस्ट शेअर करत म्हणते, "भेटा माझ्या आयुष्यातील सांताला..." या कॅप्शनपुढे अभिनेत्रीने 'ENGAGE' असा हॅशटॅग देखील वापरला आहे. अभिनेत्रीच्या जोडीदाराचं नाव आहे श्रीकांत चवरे ( SHRIKANT CHAVARE ). तिच्या होणाऱ्या नवऱ्याचं इन्स्टाग्राम अकाऊंट प्रायव्हेट आहे, त्याने बायोमध्ये नमूद केल्यानुसार IIT BOMBAY मधून त्याचं शिक्षण पूर्ण झालं आहे. तो ड्रोन फोटोग्राफर आहे. त्याला ट्रॅव्हल व फोटोग्राफीची आवड आहे. गायत्रीने सोशल मीडियावर होणाऱ्या नवऱ्याचा चेहरा रिव्हिल केल्यावर नेटकऱ्यांनी तिला पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. आता गायत्री लग्नबंधनात केव्हा अडकणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, गायत्री दातारच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर, 'तुला पाहते रे' ही तिची मालिका प्रचंड गाजली. यानंतर ती 'बिग बॉस मराठी'च्या तिसऱ्या पर्वात झळकली होती. गायत्रीने 'कलर्स मराठी'च्या 'अबीर गुलाल' या मालिकेत सुद्धा शुभ्रा ही महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती. याशिवाय 'झी मराठी'च्या 'चल भावा सिटीत' या कार्यक्रमात ती स्पर्धक म्हणून सहभागी झाली होती. मराठी कलाविश्वात सध्या लगीनघाई सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. पूजा बिरारी, प्राजक्ता गायकवाड, अनुष्का पिंपुटकर अशा अनेक अभिनेत्री यंदाच्या वर्षी लग्नबंधनात अडकल्या. तर, ज्ञानदा रामतीर्थकरचा नुकताच साखरपुडा पार पडल्याचं पाहायला मिळालं. आता या पाठोपाठ आणखी एका अभिनेत्रीने चाहत्यांबरोबर लग्न ठरल्याची आनंदाची बातमी शेअर केली आहे. तसेच सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करत तिने आपल्या होणाऱ्या नवऱ्याची ओळखही सर्वांना करून दिली आहे. 'तुला पाहते रे' या मालिकेमुळे घराघरांत लोकप्रिय झालेली अभिनेत्री गायत्री दातार आता लवकरच बोहल्यावर चढणार आहे.

## सर्वांची मनं जिंकली

## विराटचा एक जुना व्हीडिओ व्हायरल होत आहे

# विराटने मुलांना दिलं सरप्राईज

## ८३ चेंडूत शतक झळकावलं

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आज २५ डिसेंबर रोजी देशभरात ख्रिसमस सण साजरा केला जातो. या दिवशी सांताक्लॉज मुलांना भेटवस्तू देतो, असा लहान मुलांचा समज आहे. दरम्यान भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू विराट कोहलीने स्वत: सांताक्लॉज बनत लहान मुलांना गिफ्ट दिल्याचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे..**



गेली अनेक वर्षे क्रिकेटच्या मैदानावर धावांचा आणि शतकांचा पाऊस पाडत सर्वांची मनं जिंकणारा विराट कोहली लहान मुलांसाठी ख्रिसमसनिमित्त सांताक्लॉज बनला होता. हा जुना व्हीडिओ स्टार स्पोर्ट्सने शेअर केला आहे. यामध्ये सांताक्लॉज बनून विराटने लहान मुलांना गिफ्ट्स दिले आहेत. विराट कोहलीने सांताक्लॉजच्या वेशातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ स्टार स्पोर्ट्सच्या 'एक्स' अकाउंटवरून पोस्ट करण्यात आला आहे. या व्हिडिओमध्ये विराट कोहलीने कोलकाता येथील एका आश्रमातील मुलांना खास ख्रिसमसनिमित्त भेटवस्तू दिल्या आहेत. व्हिडिओमध्ये तेथील अनेक मुलं सांताकडे ख्रिसमससाठी वेगवेगळ्या भेटवस्तू मागताना दिसत आहेत.काहींनी क्रिस्टियानो रोनाल्डोला भेटण्याची इच्छा व्यक्त केली, तर काहींनी विराट कोहली आणि स्पायडर-मॅनला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. हा व्हिडिओ सहा वर्षांपूर्वीचा आहे, २०१९ मध्ये विराट कोहलीने या आश्रमाला भेट दिली होती. व्हिडिओमध्ये, विराट कोहली मुलांच्या इच्छा ऐकताना दिसतो आणि नंतर ख्रिसमसच्या दिवशी सांताक्लॉजच्या वेशात मुलांना भेट देऊन त्यांना भेटवस्तू देतो. भेटवस्तू मिळाल्यानंतर मुले आनंदी दिसत होती पण विराटने त्याचा सांताक्लॉजचा पोशाख काढून त्याच्या खऱ्या रूपात दिसल्यावर त्यांचा आनंद द्विगुणित झाला. समोर साक्षात विराट कोहलीला पाहून सर्व मुलं त्याला मिठी मारण्यासाठी धावली. हा व्हिडिओ जुना असला तरी, तो पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात चाहत्यांच्या पसंतीला उतरला आहे

.विराट कोहली यंदाच्या ख्रिसमसपूर्वी विजय हजारे ट्रॉफी खेळण्यासाठी उतरला होता. २४ डिसेंबरला झालेल्या सामन्यात विराट कोहलीने ८३ चेंडूत शानदार शतक झळकावलं आणि चाहत्यांना ख्रिसमसचं छान गिफ्ट दिलं. इतकंच नव्हे तर त्याने लिस्ट ए क्रिकेटमध्ये १६ हजार धावा पूर्ण करत महान सचिन तेंडुलकरचा मोठा विक्रमही मोडला. विराट कोहलीसह मुंबईकडून खेळताना रोहित शर्माने देखील शतकी खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.आज २५ डिसेंबर रोजी देशभरात ख्रिसमस सण साजरा केला जातो. या दिवशी सांताक्लॉज मुलांना भेटवस्तू देतो, असा लहान मुलांचा समज आहे. दरम्यान भारतीय क्रिकेट संघाचा स्टार खेळाडू विराट कोहलीने स्वत: सांताक्लॉज बनत लहान मुलांना गिफ्ट दिल्याचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे..गेली अनेक वर्षे क्रिकेटच्या मैदानावर धावांचा आणि शतकांचा पाऊस पाडत सर्वांची मनं जिंकणारा विराट कोहली लहान मुलांसाठी ख्रिसमसनिमित्त सांताक्लॉज बनला होता. हा जुना व्हीडिओ स्टार स्पोर्ट्सने शेअर केला आहे. यामध्ये सांताक्लॉज बनून विराटने लहान मुलांना गिफ्ट्स दिले आहेत.विराट कोहलीने सांताक्लॉजच्या वेशातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ स्टार स्पोर्ट्सच्या 'एक्स' अकाउंटवरून पोस्ट करण्यात आला आहे. एका आश्रमातील मुलांना खास ख्रिसमसनिमित्त भेटवस्तू दिल्या आहेत. व्हिडिओमध्ये तेथील अनेक मुलं सांताकडे ख्रिसमससाठी वेगवेगळ्या भेटवस्तू मागताना दिसत आहेत.काहींनी क्रिस्टियानो रोनाल्डोला भेटण्याची इच्छा व्यक्त केली, तर काहींनी विराट कोहली आणि स्पायडर-मॅनला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. हा व्हिडिओ सहा वर्षांपूर्वीचा आहे, २०१९ मध्ये विराट कोहलीने या आश्रमाला भेट दिली होती.

### सांताक्लॉजच्या वेशात भेट

व्हिडिओमध्ये, विराट कोहली मुलांच्या इच्छा ऐकताना दिसतो आणि नंतर ख्रिसमसच्या दिवशी सांताक्लॉजच्या वेशात मुलांना भेट देऊन त्यांना भेटवस्तू देतो.भेटवस्तू मिळाल्यानंतर मुले आनंदी दिसत होती पण विराटने त्याचा सांताक्लॉजचा पोशाख काढून त्याच्या खऱ्या रूपात दिसल्यावर त्यांचा आनंद द्विगुणित झाला. समोर साक्षात विराट कोहलीला पाहून सर्व मुलं त्याला मिठी मारण्यासाठी धावली. हा व्हिडिओ जुना असला तरी, तो पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणात चाहत्यांच्या पसंतीला उतरला आहे.

## २०२५ मध्ये हरमनप्रीत कौरने करून दाखवलं

# महिला विश्वचषकावर पहिल्यांदाच कोरलं भारताचं नाव

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय महिला संघासाठी २०२५ हे वर्ष ऐतिहासिक ठरलं. हरमनप्रीत कौरने ते करून दाखवलं, जे आजवर कुठल्याही भारतीय महिला कर्णधाराला करता आलं नव्हतं. २ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी मुंबईतील डी.वाय.पाटील स्टेडियममध्ये पार पडलेल्या सामन्यात भारतीय महिला संघाने दक्षिण आफ्रिकेचा पराभव केला आणि पहिल्यांदाच महिला वनडे विश्वचषकावर नाव कोरलं.**



५२ वर्ष वाट पाहिल्यानंतर मिळालेला हा विजय भारतीय महिला क्रिकेटला नव्या उंचीव घेऊन गेला आहे.

भारतीय संघाचा वनडे विश्वचषक जिंकण्याचा प्रवास मुळीच सोपा नव्हता. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी भारतीय महिला संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात होतं. पण साखळी फेरीत पाकिस्तानला पराभूत केल्यानंतर,बलाढ्य संघांविरूद्ध खेळताना भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला होता.

त्यामुळे उपांत्य फेरीचं गणित जर- तर वर आले होते. पण, नशिबाने साथ दिली आणि भारतीय संघाने अंतिम फेरीत धडक मारली.

भारतीय संघाचा उपांत्य फेरीतील सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध पार पडला. हा सामना भारतीय संघासाठी अंतिम सामन्यापेक्षा कमी नव्हता. त्यामुळे विश्वचषक जिंकायचा असेल, तर हा सामना जिंकणं भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचं होतं. या सामन्यात जेमिमा रॉड्रिग्जने शतकी खेळी करून, २०११ वनडे विश्वचषक स्पर्धेत युवराज सिंगने झळकावलेल्या आठवणींना उजाळा दिला. हा सामना जिंकून भारतीय संघाने दणक्यात अंतिम फेरीत प्रवेश केला.

### आफ्रिकेवर मिळवला विजय

स्पर्धेतील अंतिम सामना भारत आणि दक्षिण आफ्रिका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात भारतीय संघ पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने ५० षटकांअखेर २९८ धावांचा डोंगर उभारला. यादरम्यान सलामीला आलेल्या शफाली वर्माने ८७ धावांची दमदार खेळी केली होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शुक्रवार।
दि. 26 डिसेंबर 2025

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन-PCMC : डॉ. सुहास कांबळे यांच्या

# उमेदवारीचे सर्वस्तरातून ‘वेलकम’!

### आमदार महेश लांडगे यांचा ‘विनिंग कॅन्डिडेट’ : भारतीय जनता पार्टीचा प्रोफेशनल उमेदवार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ साठी प्रभाग क्रमांक ८ मधून प्रसिद्ध अस्थिरोगतज्ञ डॉ. सुहास कांबळे यांना भारतीय जनता पार्टीकडून अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सर्वस्तरातून त्यांच्या उमेदवारीचे स्वागत होत आहे. आरोग्यसेवेत प्रदीर्घ काळ केलेले योगदान, प्रामाणिक कार्यशैली आणि समाजाशी असलेली घट्ट नाळ यामुळे डॉ. कांबळे यांची उमेदवारी ‘विनिंग कॅन्डिडेट’ म्हणून ओळखली जात आहे.**




आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली डॉ. कांबळे यांनी भाजपात जाहीर प्रवेश केला असून, पक्षाने त्यांच्यावर विश्वास टाकत प्रभाग क्रमांक ८ मधून उमेदवारी दिली आहे. “डॉ. सुहास कांबळे हे केवळ डॉक्टर नाहीत, तर समाजाशी बांधिलकी जपणारे प्रोफेशनल व्यक्तिमत्त्व आहेत.

डॉ. सुहास कांबळे यांचा जन्म बेळगाव येथे झाला असून शिक्षण पुण्यात झाले. बी.जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथून एम.बी.बी.एस. व एम.एस. (ऑर्थोपेडिक्स) पदवी घेतल्यानंतर त्यांनी रुग्णसेवेला सुरुवात केली. भोसरी येथील चार खाटांच्या छोट्या रुग्णालयापासून आज १०० खाटांच्या अत्याधुनिक साईनाथ हॉस्पिटलपर्यंतचा त्यांचा प्रवास हा संघर्ष, गुणवत्ता आणि सेवाभावाचा आदर्श ठरला आहे. रोबोटिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हाडांच्या शस्त्रक्रियेत त्यांनी नवे मानदंड प्रस्थापित केले असून हजारो रुग्णांना वेदनामुक्त जीवन दिले आहे. आरोग्यसेवेपलीकडे जाऊन समाजाच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याच्या उद्देशाने डॉ. कांबळे यांनी राजकारणात सक्रिय सहभाग घेतला आहे. आरोग्य, स्वच्छता, पायाभूत सुविधा, महिला व युवकांसाठी सुरक्षित प्रभाग, तसेच पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन ही त्यांची प्रमुख प्राधान्ये असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रभाग क्रमांक ८ अंतर्गत येणाऱ्या जय गणेश साम्राज्य, जलवायु विहार, केंद्रीय विहार, पीएमआरडीए सेक्टर १२, संत नगर, महाराष्ट्र कॉलनी, इंद्रायणीनगर, खंडेवस्ती, गवळीमाथा, बालाजीनगर आदी भागातील नागरिकांमध्ये त्यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक वातावरण आहे. विविध सामाजिक, व्यावसायिक व युवक संघटनांनीही त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे.

“डॉक्टर म्हणून ज्या निष्ठेने रुग्णसेवा केली, त्याच प्रामाणिकपणे लोकप्रतिनिधी म्हणूनही सेवा देईन,” असा विश्वास डॉ. सुहास कांबळे यांनी व्यक्त केला. एकूणच, भाजपाचा हा प्रोफेशनल उमेदवार प्रभाग क्रमांक ८ मध्ये विकासाची नवी दिशा देईल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

> “डॉक्टर म्हणून मी प्रामाणिकपणे रुग्णांचे दुःख कमी केले; लोकप्रतिनिधी म्हणूनही प्रत्येक नागरिकाच्या प्रश्नांवर तितक्याच संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करेन. आरोग्य, स्वच्छता आणि मूलभूत सुविधा या प्रत्येक नागरिकाचा हक्क आहेत. प्रभाग क्रमांक ८ चा सर्वांगीण विकास हीच माझी प्राथमिकता असेल.
>
> **– डॉ. सुहास कांबळे,** प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ, उमेदवार, भाजपा, प्रभाग- 8 इंद्रायणीनगर-भोसरी.

---

## राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेत तनया पाटील हिचे "सुवर्णयश"

### शिक्षण विश्व : राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याने गायत्री शाळेच्या नावलौकिकात भर

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, मोशी येथील गुणवंत विद्यार्थिनी तनया दत्ता पाटील हिने राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत शैक्षणिक क्षेत्रासोबतच क्रीडा क्षेत्रातही शाळेचे नाव उज्ज्वल केले आहे. या उल्लेखनीय यशाच्या जोरावर तिची राष्ट्रीय स्तरावरील कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली असून, ही बाब संपूर्ण शाळेसाठी अभिमानास्पद ठरली आहे.**




राज्यस्तरीय स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील नामांकित खेळाडूंशी सामना करत तनयाने उत्कृष्ट डावपेच, संयम, अचूकता आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अव्वल कामगिरी सादर केली. सातत्यपूर्ण सराव, प्रशिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि स्वतःवरील विश्वास यामुळेच हे सुवर्णयश मिळाल्याचे तिच्या कामगिरीतून स्पष्ट झाले.

तनयाच्या या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थी, शिक्षक व पालकांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी प्रावीण्य मिळवावे, या शाळेच्या ध्येयधोरणांना तिच्या यशामुळे अधिक बळ मिळाले आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी तनया दत्ता पाटील हिचे विशेष कौतुक करत तिच्या मेहनतीचे, शिस्तीचे आणि चिकाटीचे मनापासून अभिनंदन केले. राष्ट्रीय स्तरावरही तनया उत्कृष्ट कामगिरी करून शाळा, संस्था व परिसराचे नाव देशपातळीवर उज्ज्वल करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

व्यवस्थापकीय संचालक, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि संपूर्ण गायत्री परिवाराच्या वतीनेही तनयाचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. आता राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेतही तनया आपले कौशल्य सिद्ध करून आणखी एका यशाची भर घालेल, अशी अपेक्षा शाळेने व्यक्त केली आहे.

# चिखलीत वसंत बोराटे आणि
# राष्ट्रवादी पॅनलची झंजावती प्रचारात आघाडी!

## मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; चिखली गावठाण, रोकडे वस्तीत 'परिवर्तना'चे वारे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**निवडणुकीच्या रणधुमाळीत चिखली गावठाण, गणेश मंदिर, रोकडे वस्ती आणि महादेव नगर परिसरात प्रचाराचा धडाका उडाला आहे. या भागात वसंत बोराटे यांनी आपल्या झंझावाती दौऱ्याने मोठी आघाडी घेतली असून, त्यांना नागरिकांचा, विशेषतः महिला वर्गाचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. "केवळ आश्वासने नकोत, तर ठोस कृती करून चिखलीचा चेहरामोहरा बदलू," असा शब्द बोराटे यांनी यावेळी दिला.**



महिलांच्या समस्यांवर बोराटे यांचा थेट संवाद साधला. प्रचारा दरम्यान आयोजित कोपरा सभांमध्ये महिलांनी आपली कैफियत मांडली. अपुरा पाणीपुरवठा, स्वच्छतेचा अभाव आणि सुरक्षेचे प्रश्न यांवर महिलांनी बोराटे यांचे लक्ष वेधले. यावर भाष्य करताना वसंत बोराटे म्हणाले, "महिलांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या दैनंदिन अडचणींचे निराकरण ही माझी पहिली प्राथमिकता आहे. सुरक्षित चिखली आणि मूलभूत सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी मी कटिबद्ध आहे." असे सांगितले.

> केवळ निवडणूक जिंकणे हे ध्येय नसून, विकासाच्या प्रक्रियेत प्रत्येक नागरिकाचा सहभाग असावा, अशी संकल्पना आहे.
> – **वसंत बोराटे,**

वसंत बोराटे यांचा हा प्रचार केवळ 'हायटेक' स्वरूपाचा नसून, थेट मतदारांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचण्यावर त्यांचा भर आहे. रस्ते, वीज आणि पाणी या प्रलंबित प्रश्नांवर त्यांनी अत्यंत ठाम आणि स्पष्ट भूमिका घेतली आहे.

परिसराच्या आधुनिक विकासासाठी आणि नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी त्यांच्याकडे विशेष 'व्हिजन' असल्याचे जाणवते. संघटनात्मक आणि सामाजिक कामात सक्रिय असल्याने त्यांना जनतेच्या नाडीची अचूक ओळख आहे. ते आत्मीयतेने संवाद साधत असल्याने चिखली परिसरात सध्या बोराटे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे.

---

# नरेंद्र सिंग यांची दिमाखदार कामगिरी

## शिक्षण विश्व : राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत ट्रॅप शूटिंग प्रकारात पदकाची कमाई

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**अनुभवी नेमबाज नरेंद्र सिंग यांनी ६८ व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत दमदार कामगिरी करत पुन्हा एकदा भारतीय क्रीडाविश्वात आपले स्थान अधोरेखित केले आहे. दिल्लीतील डॉ. कर्णी सिंग शूटिंग रेंज येथे झालेल्या या स्पर्धेत ट्रॅप शूटिंग प्रकारात त्यांनी पदकाची कमाई केली.**

या स्पर्धेत नरेंद्र सिंग यांनी अचूक नेम आणि शांत संयमाच्या जोरावर अंतिम फेरीत मजल मारली. दीर्घकाळाच्या कठोर सरावानंतर राष्ट्रीय पातळीवर मिळवलेले हे यश त्यांच्या जिद्द आणि चिकाटीचे प्रतीक मानले जात आहे. सध्या भारतीय नेमबाजी जागतिक स्तरावर नवे उच्चांक गाठत असताना सिंग यांची ही कामगिरी विशेष ठरली आहे.

अंतिम फेरीत नरेंद्र सिंग यांनी अत्यंत संयमित आणि अचूक खेळाचे प्रदर्शन करत बलाढ्य प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकले. दबावाखालीही त्यांनी आपली लय कायम राखली. त्यांच्या या कामगिरीचे स्पर्धा अधिकारी आणि सहकारी खेळाडूंनीही कौतुक केले. ६८ वी राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा अनेक अर्थाने ऐतिहासिक ठरली. या स्पर्धेत विक्रमी सहभाग नोंदवण्यात आला असून अनेक जागतिक दर्जाच्या गुणसंख्या पाहायला मिळाल्या. भारतातील नेमबाजीचा वाढता दर्जा या स्पर्धेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाला.

## आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेत

# ‘उद्याच्या भारताच्या शिक्षणव्यवस्थे’वर मंथन!

### डॉ.गिरीशदेसाईयांचेप्रेरणादायीविचार;शिक्षणातलवचिकता,सुसंगततावजागतिकपोहोचयावरभर

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**२१व्या आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषद व संस्थात्मक उत्कृष्टता व नेतृत्व पुरस्कार २०२५ कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रण मिळाल्याबद्दल डॉ. गिरीश देसाई यांनी गौरव व्यक्त केला. ही परिषद RAMACHANDRAN INTERNATIONAL INSTITUTE OF MANAGEMENT (RIIM पुणे) यांच्या वतीने, BRAIN WORLD व PUNE MANAGEMENT ASSOCIATION याच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली होती.केले.**

परिषदेतील “उद्यासाठी रूपांतरित भारताचे शिक्षण : लवचिकता, सुसंगतता व विस्तार” या विषयावर बोलताना डॉ. देसाई म्हणाले की, बदलत्या काळात शिक्षणव्यवस्था तंत्रज्ञानस्नेही, उद्योगाभिमुख आणि समाजाभिमुख असणे अत्यावश्यक आहे.

शिक्षणातील नवोपक्रम, कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम आणि जागतिक दृष्टीकोन यामुळे भारताची शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या वेळी RIIM चे अध्यक्ष सुरज शर्मा, कॅम्पस संचालक डॉ. अजित साने, पुणे मॅनेजमेंट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रदीप तुपे तसेच BRAIN WORLD GROUPच्या व्यवस्थापकीय संचालिका रेशू अग्रवाल यांच्या नेतृत्वाबद्दल डॉ. देसाई यांनी विशेष आभार मानले. अशा परिषदांमुळे शैक्षणिक उत्कृष्टतेचा गौरव होतो आणि परिवर्तनशील नेतृत्व घडण्यास चालना मिळते, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. गिरीश देसाई सध्या PIMPRI CHINCHWAD EDUCATION TRUST, PIMPRI CHINCHWAD UNIVERSITY व NMVPM येथे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असून, शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव तसेच FIDEL SOFT TECH LTD येथे स्वतंत्र संचालक म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत.

शिक्षण क्षेत्रातील शाश्वत परिवर्तनासाठी अशा आंतरराष्ट्रीय परिषदा महत्त्वपूर्ण ठरत असून, भविष्यातील भारत घडविण्यासाठी त्या दिशादर्शक ठरत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

## विद्यार्थ्यांनी अनुभवले गणिताची सृजनशीलता!

### शिक्षण विश्व: राष्ट्रीय गणित दिनानिमित्त मोशीतील प्रियदर्शनी स्कूलमध्ये प्रदर्शनाचे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**मोशी येथील प्रियदर्शनी स्कूलमध्ये राष्ट्रीय गणित दिनानिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात गणित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे संपूर्ण नियोजन व सादरीकरण माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी केले होते. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचा तसेच गणितीय संकल्पनांवरील सखोल आकलनाचा या उपक्रमातून प्रभावी प्रत्यय आला.**

प्रदर्शनात विविध मॉडेल्स, चार्ट्स, पझल्स व कार्यकारी प्रकल्पांच्या माध्यमातून भूमिती, भिन्न, मापन, नफा-तोटा, आकार, सममिती तसेच गणिताचे दैनंदिन जीवनातील उपयोग अशा अनेक संकल्पना आकर्षक पद्धतीने मांडण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षक, पालक व पाहुण्यांसमोर आत्मविश्वासाने आपली मांडणी स्पष्ट केल्यामुळे प्रदर्शन अत्यंत संवादात्मक व माहितीपूर्ण ठरले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचारशक्ती, समस्या सोडवण्याची क्षमता तसेच सादरीकरण कौशल्यांचा विकास झाला. गणिताबद्दलचा भीतीभाव दूर होऊन विद्यार्थ्यांमध्ये या विषयाविषयी उत्साह व आवड निर्माण झाली.

प्रदर्शनाच्या संपूर्ण तयारीदरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. गणित हा केवळ अभ्यासाचा विषय नसून दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे, हा संदेश या प्रदर्शनातून प्रभावीपणे देण्यात आला. एकंदरीत, हे गणित प्रदर्शन यशस्वी ठरले असून विद्यार्थ्यांसाठी समृद्ध व प्रेरणादायी शिकण्याचा अनुभव ठरला.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046